# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबईतील विक्रोळी पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) १३७ (२७-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पूर्व पश्चिम जोडणा-या उड्डाणपुलाचे काम ८ वर्ष होऊनही अद्याप पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास ३३ कोटी रुपये खर्च होणार होता परंतु ८ वर्ष प्रलंबित असल्याने आता ९५ कोटीपर्यत खर्च होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उड्डाणपुलाचे काम इतके वर्ष प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी करुन उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२६) :**

(१) हे खरे नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर उड्डाणपुलाच्या कामाच्या निविदेनुसार रु.३७.०६/- कोटी इतक्या रकमेचे कंत्राट देण्यात आले होते. आय.आय.टी. मुंबई यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार व सुचनांनुसार पूल बांधकामाचे आराखडे व इत्यादीमध्ये सुधारणा करण्यात आल्याने कामाच्या खर्चात व वेळेत वाढ झाली.

(४) सदर उडाणपूलाचे काम पूर्ण झाले असुन दिनांक १४ जून, २०२६ रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात चंद्रपूर व सांगली जिल्ह्यात पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमान योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(२) ८७०९ (१९-०८-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना सन २००४ पासुन सुरू करण्यात आली असून सन २०१८ मध्ये या योजनेत बदल केला आहे, हे खरे आहे काय,

वि.स. ३४ (2)

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमीहीन, विधवा व परित्यक्त्यांना प्रतिलाभार्थी ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर ओलीताची जमिन १०० टक्के अनुदानावर देण्यात येते परंतु गत २१ वर्षामध्ये चंद्रपूर जिल्हयात केवळ ४६ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत २ वर्षात एकाही लाभार्थ्याला जमिन वितरीत करण्यात आली नसून अनुसूचित जाती, नवबौध्द, दारिद्रय रेषेखालील भूमीहीन, विधवा व परित्यक्ता यांच्या विकासाकरिता असलेल्या सदर योजनेची अंमलबजावणी जिल्ह्यात योग्य पद्धतीने होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सांगली जिल्ह्यातील सन २०१८ पासून अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील भुमिहीन मजुरांनी अर्ज देऊनही उक्त योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील चंद्रपूर व सांगली जिल्ह्यात पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमान योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (१०-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०२३-२४ व २०२४-२५ या २ वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात एकाही लाभार्थ्याला जमीन वितरीत करण्यात आलेली नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या अनुषंगाने सदर योजनेबद्दल वृत्तपत्रे, आकाशवाणी, स्थानिक टि.व्ही. चॅनेल, होर्डिंगद्वारे गावागावांमध्ये व जिल्हास्तरावर प्रचार व प्रसिद्धी करण्यात येते. तसेच, लाभार्थ्यांना वाटपाकरीता शेतजमीन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शेतजमीन विक्रीस इच्छुक शेतक-यांकडून विक्रीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत विविध वृत्तपत्रांद्वारे आवाहन करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड किल्ल्यावर सुरक्षेच्या दृष्टीने बसविण्यात आलेले १५ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत

**(३) ९०३४ (१०-१०-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्यावर सुरक्षेच्या दृष्टीने बसविण्यात आलेले १५ सीसीटीव्ही कॅमेरे गत ५ वर्षांपासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केंद्रीय गृहमंत्री किल्ल्यावर आले असता सीसीटीव्ही बंद असल्याने सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रायगड किल्यावरील बळकाविलेल्या जागा, अनधिकृत बांधकामे, वाहतूक आणि गर्दीवर नियंत्रण नसणे तसेच पर्यटनाच्या नावाखाली ऐतिहासिक स्थळांची अवहेलना होणे यामुळे ऐतिहासिक वारसास्थळांचा

वि.स. ३४ (3)

अवमान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरू करून त्याची देखभाल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज समाधीस्थळी व जगदीश्वर मंदिराच्या स्थळी ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून सद्यस्थितीत ३ कॅमेरे कार्यान्वित आहेत. तसेच, रायगड किल्लयावर कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड यांचे कार्यालयाकडून माहे जून, २०२३ मध्ये ५८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून सर्व कॅमेरे सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व विभागाने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची कंट्रोल रूम हत्तीखान्याच्या मुख्य दालनातून हत्तीखान्याला लागूनच असलेल्या स्टोअर रूम येथे स्थलांतर करण्याचे काम प्रगतीपथावर होते. यानंतर दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत ५८ पैकी एकुण ४० कॅमेरे कार्यरत करण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ यांनी दिलेल्या माहितीनुसार रायगड किल्ल्यावरील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाबाबत संबंधित अनधिकृत रहिवाशांना नोटिस बजावण्यात आली आहे.

पर्यटक व्यवस्थापनासाठी किल्लयावरील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

(४) सद्य:स्थितीत सदरहू सर्व सीसीटीव्हि कॅमेरे कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पावसाळा सुरु होण्यापूर्वी शासनाने करावयाच्या उपाययोजना

**(४) ९२९० (१८-०८-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळ्यात मुंबईत सखल भागात पाणी साचून रस्ते, रेल्वे वाहतुकीवर विपरीत परिणाम होणार नाही आणि मुंबईकरांना त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विभागात जेथे पाणी साचते तेथे पाणी उपसा करणारे पंप लावण्यात यावे, मुंबई पूर्व उपनगरांमध्ये पवई, कांजुरमार्ग, भांडूप, मुलुंड, मालाड आदी ठिकाणी पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका असतो त्यामुळे अशा सर्व ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्यात यावे, मुंबई शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरात २५ विभाग पातळीवर नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात यावे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतीतील विविध कामे आणि मेट्रो रेल्वे इत्यादी प्रकल्पांच्या ठिकाणी कोणताही राडारोडा पडून राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, मुंबई विभागातील तुंबलेल्या सर्व नाल्यांची सफाई करण्यात यावी यासह अन्य मागण्याही शासनास करण्यात आले असल्याचे हि निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मुंबई विभागात पाणी साठून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

वि.स. ३४ (4)

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) उप प्रमुख अभियंता (प्रवप) पजवा या कार्यालयामार्फत मुंबई शहरातील प्रत्येक विभाग पातळीवरुन प्राप्त होणा-या मागणीनुसार मुंबई शहरात एकूण ४७७ ठिकाणी विविध आकाराचे उदंचन संच बसविण्यात आले आहेत. या सर्व उपाय योजना करुन मुंबई शहरातील जनजीवन कमीत कमी बाधित होऊन ते सुरळीत चालण्याकरिता महानगरपालिकेमार्फत पावले उचलण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागामार्फत दिनांक ०४ मार्च, २०१५ अन्वये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबईतील संभाव्य दरडी कोसळण्याच्या ठिकाणी ९ मीटरच्या आत असणा-या संरक्षक भिंतींचे बांधकाम झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत व ९ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या संरक्षक भिंतींचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते व याकरिता आवश्यक निधी जिल्हा उपनियोजन समितीमार्फत उपलब्ध करुन देण्यात येतो.

महानगरपालिका मुख्यालयातील मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर महानगरपालिकेच्या २५ विभागांमध्ये आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रस्थापित करण्यात आले असून हे नियंत्रण कक्ष वर्षाचे ३६५ दिवस २४ तास सुरु असतात. विभागीय नियंत्रण कक्षांमध्ये तीनही सत्रांकरिता मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विविध कामे आणि मेट्रो रेलवे इत्यादी प्रकल्पांच्या ठिकाणी कोणताही राडारोडा पडणार नाही याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विविध कामे आणि मेट्रो रेल्वे तथा इत्यादी प्रकल्पांच्या संबंधित अधिकाऱ्यांशी विभाग कार्यालायातर्फे समन्वय साधण्यात येतो. तसेच राडारोडा पडला असल्यास तो उचलण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विविध कामे आणि मेट्रो रेल्वे इत्यादी प्रकल्प यांची असून त्यांचामार्फत राडारोडा उचलण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औंढा नागनाथ व कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(५) ९३०६ (०८-०९-२०२५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेतंर्गत औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याने त्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांचे वेतन हे नियमित १ तारखेला करण्यात येईल, वेतनासाठी सेवानिवृत्त शिक्षकांना पंचायत समितीकडे पायपीट करावी लागणार नाही असे आश्वासन जिल्हा परिषद प्रशासनाने सेवानिवृत्त शिक्षकांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सेवानिवृत्त शिक्षकांना वेतन त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, हिंगोली यांनी, वेळेवर वेतन अदा करण्याचा प्रयत्न या कार्यालयाचा राहिलेला आहे. तसेच यापुढे तत्परतेने वेतन वेळेवर अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे कळविले आहे.

(३) दिनांक १७ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना, वेळेवर निवृत्तीवेतन अदा करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात कुणबी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अडचणी येत असल्याबाबत

**(६) ९३०७ (२०-०७-२०२५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात कुणबी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याने मराठा समाज बांधवांनी आंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बार्टी संस्था व शिंदे आयोग, महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियमांचे अटी व शर्तींचे पालन करून व सर्व पुरावे देऊनही कुणबी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कुणबी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (१३-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## कुळगाव,बदलापूर(जि.ठाणे)येथील बी.एस.यु.पी.योजनेबाबत

**(७) ९३५३ (१८-०९-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच शहरातील गरीब नागरिकांसाठी शासनाने बी.एस.यु.पी. योजना राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शहरातील गरीब लाभार्थ्यांना या घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला असून काही लाभार्थी या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बी.एस.यु.पी. योजनेतंर्गत किती सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे त्यापैकी किती सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे व किती सदनिका वाटप करणे शिल्लक आहे,

वि.स. ३४ (6)

(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील बी.एस.यु.पी.योजनेतील घरांची सद्य:स्थिती काय आहे तसेच उर्वरित लाभार्थ्यांना सदनिका वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत ९०४ सदनिकांचे बांधकाम केले असून या योजनेअंतर्गत ५३२ लाभार्थ्यांनी घरकुल योजनेचा लाभ घेतला आहे. त्यापैकी ३९० लाभार्थ्यांनी स्वहिस्सा शुल्क व तद्नुषंगिक बाबींची पूर्तता केल्याने त्यांना घराचे ताबापत्र दिले असून उर्वरित लाभार्थींना ताबापत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे.

म्हाडा कुळगांव व सोनिवली येथे एकूण ५३२ सदनिकांमध्ये लाभार्थी झोपडपट्टी धारक व प्रकल्पबाधित राहत आहेत. त्यापैकी ३७२ सदनिकांचे वाटप न केल्याने शिल्लक असून या सदनिका प्रधानमंत्री आवास योजनेतून वाटप करणे प्रस्तावित आहे.

(४) कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील काही झोपडपट्टीधारकांनी त्यांच्या मुळ घराची/झोपडीची विभागणी करुन नातेवाईक व इतरांना कर व इतर कागदपत्रांद्वारे घराचा भाग नावे करून दिला आहे. तथापि, सदर कागदपत्रे व कर आकारणी सन २०११ नंतर केली असल्याने त्यांना घरांचे ताबापत्र देण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेट्रो प्रकल्प १४ या प्रकल्पाबाबत

**(८) ९३६० (१८-०९-२०२५) श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड. पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजुरमार्ग शिळफाटा तळोजा कल्याण, अंबरनाथ, बदलापूर या मेट्रो प्रकल्प १४ ला सन २०१८-१९ मध्ये मंजुरी देवून त्याचा डी. पी. आर. तयार होवून कन्सल्टंसीचे निविदा सुद्धा काढण्यात आल्याचे निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो प्रकल्प १४ हा ३७.८ किलोमीटर लांबीचा असून या मार्गावर १५ स्थानके असणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रकल्पाचे काम लवकरात लवकर करून मेट्रो सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) मुंबई मेट्रो मार्ग १४ (कांजूरमार्ग ते बदलापूर) या प्रस्तावित मेट्रो मार्ग प्रकल्पाची लांबी ४३.६९ किमी असून २४ स्थानके प्रस्तावित आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४७ व्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्ग-१४ चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. मिलान मेट्रो यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सविस्तर

वि.स. ३४ (7)

प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम झाल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांच्या तांत्रिक मान्यतेबाबत

**(९) ९३६१ (०८-०९-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगरपरिषद (जि. ठाणे) येथील विविध विकास तांत्रिक कामांच्या मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून मान्यता घ्यावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तांत्रिक कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सक्षम असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांच्या व इतर विकास कामांच्या बाबतीत टेक्नीकल बाबी व गुणवत्ता याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला हे अधिकार देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मनुष्यबळ कमी असून त्यास तातडीने तांत्रिक मान्यता मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर शहरात होणाऱ्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१), (२) व (३) अंबरनाथ व कुळगांव बदलापूर नगरपरीषद हद्दीतील विकास कामांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजुरी घेण्यात येते. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.धोरण/ २०१७/ प्र.क्र.६०/ नवि-१६, दिनांक १८/११/२०१७ नुसार स्थानिक स्वराज संस्थाअंतर्गत स्थापत्य कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजुरी घेण्यात येते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विविध विकास कामांच्या तांत्रिक मंजुरी देताना स्थानिक स्वराज्य संस्थांना आकारण्यात येणारी छाननी फी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुलनेने ०.२५% कमी असल्याने सदर नगरपरिषद हद्दीतील विकास कामांच्या तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घेण्यात येतात.

(४) व (५) अंबरनाथ व कुळगांव बदलापूर नगरपरीषदेशी संबंधीत विविध विकास कामांच्या तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विहित वेळेत प्राप्त होतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. ३४ (8)

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पशुपालन हा व्यवसाय समाविष्ट करणेबाबत.**

**(१०) ९३८१ (१९-०९-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पशुपालन हा व्यवसाय समाविष्ट करणेबाबत लोकप्रतिनिधिनी माहे मे, २०२५ मध्ये शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पशुपालन म्हणजेच गाय किंवा म्हैस, शेळी, कुक्कुट पालन या सर्व योजनांचा समावेश करण्यात आला असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी व नव उद्योजकांना त्याचा सर्वोतोपरी लाभ होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत या योजनेचे उद्दिष्ट हे पूर्ण जिल्ह्यासाठी १५० एवढेच असल्यामुळे अनेक इच्छूकांचे प्रस्ताव प्रलंबित राहतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे धाराशिव जिल्हयासाठी १५०० च्या आसपास उद्योगांचे उद्दिष्ट असून पशुपालन हा व्यवसाय शेतीपूरक असल्याने व जिल्ह्यातील अनेक नव उद्योजकांची मागणी असल्याने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामध्ये पशुपालन या योजनेचा समावेश केल्यास बऱ्याच लोकांना याचा लाभ होईल, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, विदर्भातील सर्वच जिल्हयात कुक्कूटपालन, मत्स्यपालन, शेळी-मेंढीपालन, संकरित गाय-म्हशी पालन इ. शेती पुरक व्यवसाय केवळ योजनेपुरतेच राहिले असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे. मा.श्री.राणाजगजितसिंह पाटील, विधानसभा सदस्य (तुळजापूर) यांनी त्यांच्या दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पशुपालन हा व्यवसाय समाविष्ट करणेबाबत विनंती केली आहे. सदर पत्र पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यविकास विभागाकडून (पशुसंवर्धन) त्यांच्या दिनांक २४ जून, २०२५ रोजीच्या टिप्पणीन्वये उद्योग विभागास प्राप्त झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे. धाराशिव जिल्ह्यातील तसेच विदर्भातील अमरावती विभागाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती व शेतीपुरक व्यवसायावर आधारीत असल्याने पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत समाविष्ट पशुपालन म्हणजेच गाय किंवा म्हैस, शेळी, कुक्कुट पालन या सर्व घटकांचा ग्रामीण भागातील शेतकरी व नव उद्योजकांना लाभ होतो.

(३) हे खरे नाही. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पोर्टलवर प्राप्त होणा-या अर्जाची छाननी करुन सर्व प्रस्ताव शिफारशीसह संबधित बँकाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येतात. सदर योजनेतंर्गत जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिव करीता सन २०२४-२५ करिता एकूण ५० उद्दिष्ट देण्यात आले होते. परंतू बँकाकडून ११३ प्रस्ताव मंजूर करुन २२६% उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाच्या माध्यमातून शेतक-यांना पशुपालन व्यवसायासाठी राष्ट्रीय पशुधन मिशन, राष्ट्रीय गोपाल योजना, पशुपालन इन्फ्रास्ट्रक्चर विकास फंड व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम यासारख्या योजनांमधून लाभ दिला जातो.

राज्य शासनामार्फत जातीवंत गायी व म्हशींच्या खरेदीसाठी अनुदान, राष्ट्रीय पशुधन अभियान (ग्रामीण

भागात पशुपालन महिलांसाठी विशेष योजना) व कामधेनू योजना तसेच कृषी विभागांतर्गत कृषी पुरक व्यवसाय म्हणून पशुपालन, दुग्ध व्यवसायासाठी कर्ज अनुदानाच्या विविध योजना तालुका कृषी अधिकारी व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येते. त्यामुळे पुन्हा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत पशुपालन व्यवसायासाठी मार्जिन मनी अनुदानाचा लाभ द्यावयाचा झाल्यास लाभार्थीकडून त्याच-त्याच पशुधनावर दुबार लाभ घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. पशुपालन व्यवसायाचा समावेश योजनांतर्गत केल्यास युवकांच्याकडून नवनवीन तंत्रज्ञानावर आधारीत विविध क्षेत्रातील प्रकल्पाच्या उभारणीवर मर्यादा येऊन योजनेच्या उद्दिष्टास बगल देण्यासारखे होईल. याकरिता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेअतंर्गत पशुपालन व्यवसायासाठी लाभ देणे योग्य होणार नाही.

(५) हे खरे नाही. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांमध्ये कुक्कूटपालन, मत्स्यपालन या घटकांचा समावेश दिनांक २१ मे, २०२५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आला आहे. या उद्योगाबाबत विविध जिल्ह्यांमध्ये जनजागृती तसेच योग्य मार्गदर्शन करण्यात येत आहे. सदर उद्योगाचा समावेश नव्यानेच करण्यात आल्याने, योजनेतंर्गत या व्यवसायासाठी सन २०२५-२६ या वर्षापासून लाभ दिला जाणार आहे.

पशुसंवर्धन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या कुक्कुटपालन, शेळी-मेंढीपालन, संकरित गायी म्हशी पालन इ. योजनेंतर्गत सर्वसाधारण, अनु.जाती/जमाती तसेच आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्राबाहेरील सर्वच पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत असून, विदर्भातील सर्वच जिल्ह्यात उक्त योजना प्रभाविपणे राबविण्यात येतात व लाभार्थ्यांना प्रत्यक्षरित्या योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कंत्राटदारांची प्रलंबित असलेल्या देयकाबाबत

**(११) ९४११ (१८-०८-२०२५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विकासकामांची कंत्राटदारांची दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास सुमारे ५४ हजार कोटी रुपयांची देयके थकली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदारानी राज्यातील सर्व विकासकामे थांबविण्याचा निर्णय कंत्राटदारांच्या संघटनेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाला दरवर्षी नियतव्ययाच्या (निधी) जास्त प्रमाणात किंमतीची कामे मंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कंत्राटदारांना प्रलंबित देयकांची रक्कम अदा करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२६-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे. रस्ते व इमारती उपक्षेत्रांतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी विकासकामांची रु.२१२९२ कोटीची देयके प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) विभागामार्फत प्राधान्यक्रम, विनिर्दिष्ट मानके, निकड व आवश्यकता तपासुन कामे मंजूर केली जातात.

(४) व (५) सन २०२५-२६ या वर्षात विद्यमान रु.२७२९७ कोटी तरतुदीव्यतिरीक्त अन्य विहित मार्गाने निधी उपलब्ध करुन प्रलंबित असलेली तसेच नव्याने निर्माण होणारी देयके अदा करण्याचे नियोजन आहे.

---

## सांगली, मिरज व कुपवाड महापालिकेतील मानधन, रोजंदारी व बदली कामगारांना पालिकेच्या सेवेत कायम सामावून घेण्याबाबत

**(१२) ९४२० (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महापालिकेतील मानधन, रोजंदारी व बदली कामगारांना पालिकेच्या कायम सेवेत सामावून घेण्याचा प्रस्तावाची नस्ती गत दीड वर्षात आठ वेळा त्रुटी काढून शासनाने महानगरपालिकेकडे परत पाठवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने त्रुटी पुर्ण करुन मानधन, रोजंदारी व बदली कामगारांना पालिकेच्या कायम सेवेत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) व (२) सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेने महानगरपालिकेमध्ये कार्यरत बदली, रोजंदारी व मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाचा प्रस्ताव सन २०२४ मध्ये सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे त्रुटींची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव महानगरपालिकेकडून मागविण्यात आला. दरम्यान, तत्कालीन शासनाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे प्रस्तावावर अंतिम निर्णय होऊ शकला नाही. आता महानगरपालिकेने एकूण ११९८ बदली, रोजंदारी व मानधन कर्मचाऱ्यांचा सुधारित प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऑलिम्पिकवीर पैलवान स्व. खाशाबा जाधव आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाच्या उभारणीला तातडीने प्रारंभ करणेबाबत

**(१३) ९४३१ (२४-०७-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९५२ मध्ये भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे पैलवान स्व. खाशाबा जाधव यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मगावी गोळेश्वर, ता. कराड, जि. सातारा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यास राज्य शासनाने दिनांक ३० जुलै, २००९ रोजी मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोळेश्वर ग्रामपंचायतीने जागा वर्ग केल्यानंतर शासनाने क्रीडा सुविधा विकासासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून त्यातील १ कोटी रुपये वितरीतही करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये स्व. खाशाबा जाधव यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यास २५ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, संबंधित जागेवर अतिक्रमण आणि न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे काम सुरु होऊ शकले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या न्यायप्रविष्ट प्रकरणासंदर्भात तसेच कुस्ती संकुलाच्या प्रत्यक्ष कामास लवकर प्रारंभ करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२०-११-२०२५) :** (१), (२), (३), व (४) स्व.खाशाबा जाधव यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त गोळेश्वर (ता. कराड, जि. सातारा) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यास शासनाने ३० जुलै, २००९ रोजी मान्यता दिली आहे. कराड ग्रामपंचायतीने जागा वर्ग केल्यानंतर रु.३ कोटी निधी मंजूर केला असून त्यापैकी रु १ कोटी प्रत्यक्ष निधी तालुका क्रीडा संकूल समितीस वितरित करण्यात आला आहे. शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ अन्वये रु.२५.७५ कोटींच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी रु.१० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. तथापि, जागेवरील अतिक्रमणासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे क्रीडा संकुल उभारण्याबाबतचे काम प्रत्यक्ष सुरु झालेले नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील रुग्णालयाची नोंद नसल्याने रुग्णांना राज्य विमा महामंडळ प्रशासनाकडून विम्याचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१४) ९४४२ (०८-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड(जि.पुणे) शहरातील महापालिकेसह कर्मचारी राज्य विमा महामंडळ ई. एस आय संचलित रुग्णालय खाजगी रुग्णालय व दवाखान्यांच्या सुरक्षा व सुविधांच्या दृष्टीने महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडे नोंदणी केल्यावर तीन वर्षाचा परवाना देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उद्योगनगरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सुमारे ६८ रुग्णालयांच्या नोंदणीची निर्धारित मुदत संपल्याने पुर्ननोंदणी करण्यात आली नसल्याचे दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, तसेच शहरात मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल्स व नामांकित दवाखाने हे महानगरपालिकेची नोंदणी नसतानाही सदस्य परवानाचे नूतनीकरण न करता सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडे मुंबई नर्सिंग ऍक्टनुसार दिनांक ३१ मार्च, २०२५ च्या विहित मुदतीत नोंदणी नसलेल्या, पुनर्नोंदणी न केलेल्या रुग्णालयांवर नोंदणी अथवा परवाना नूतनीकरण न केलेल्या रुग्णालयांवर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत बॉम्बे नर्सिंग ऍक्ट अंतर्गत परवाने रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) तसेच आपत्कालीन परिस्थितीत नोंदणी परवाना नूतनीकरण केले नसलेल्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आलेल्या कामगाराचे रुग्णालयातील भरलेल्या रकमेचे बिल कर्मचारी राज्य विमा महामंडळ प्रशासनाकडून रुग्णालयाची नोंद नसल्याने विमेचा लाभ मिळत नसल्याचे अनेक देयके रद्द किंवा प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास विम्याचा लाभ मिळत नसल्याने नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याने शहरातील नोंदणी नसलेले रुग्णालय व पुर्ननोंदणी न केलेल्या रुग्णालयांवर शासन मार्फत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. ३४ (12)

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण ६४८ खाजगी रुग्णालये नोंदणीकृत आहेत.

• यापैकी एकूण १८९ रुग्णालयांचे परवाना नुतनीकरनाची निर्धारित मुदत दि.३१ मार्च, २०२५ अशी आहे.

• यापैकी ६५ रुग्णालयांना अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची पूर्तता झाल्याची खात्री करुन ३१ मार्च, २०२८ पर्यंत नोंदणी परवाना देण्यात आला आहे.

• एकूण १२४ रुग्णालयांचे नोंदणी नुतनीकरना करिता अर्ज प्राप्त आहेत. यापैकी ८२ रुग्णालयांचे अर्ज परिपूर्ण नसल्याने कागदपत्रांची पूर्तता करणेकरिता अर्जदारास कळविले आहे. तसेच ३७ अर्जांची कागदपत्रे पडताळणी करुन नोंदणी नुतनीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

• पाच रुग्णालयांनी रुग्णालय बंद करण्याकरिता अर्ज सादर केलेले आहेत.

(३) महाराष्ट्र सुश्रुषागृह नोंदणी अधिनियम २०२१ अन्वये खाजगी रुग्णालयांनी नोंदणी परवाना संपुष्ठात येण्यापूर्वी नव्वद दिवसांच्या कालावधीत नोंदणी नूतनीकरण करण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक असते. सदर परवाना नूतनीकरण करण्याकरिता खाजगी रुग्णालयांना इतर विभागाच्या परवानग्या व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. उदा.

• महाराष्ट्र प्रदूषण नियामक महामंडळाकडील परवाना.

• अग्निशमन विभागाकडील परवाना/फायर ऑडीट.

• इलेक्ट्रिक ऑडीट.

• करसंकलन विभागाकडील कर भरल्याची पावती.

• कार्यरत सर्व डॉक्टर यांचे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपथि मेडिसिन इ. कडील परवाना नुतनीकरण.

• कार्यरत सर्व सर्व नर्सिंग स्टाफ यांचे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांच्याकडील नोंदणी परवाना नुतनीकरण.

सदर बाबींची पूर्तता करण्याकरिता खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना विविध कार्यालयांकडे अर्ज दाखल करावे लागतात व सदर परवाने प्राप्त झाल्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत नोंदी नुतनीकरण केले जाते.

नोंदणी करिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची पूर्तता करणेकामी कळविले जाते. तसेच या दरम्यान रुग्णालयांना शहरातील नागरिकांना वैद्यकीय सेवा प्राप्त होत असते. त्यामुळे सदर रुग्णालयांना सर्व परवानग्या मिळणेकामी वेळ देणे संयुक्तिक आहे.

(४) व (५) याबाबत कुठलीही लेखी तक्रार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्राप्त नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत.

**(१५) ९४८१ (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय येथे धोबीघाट (Laundry) इमारत बांधकामाचे रु.१२५१.४४ लक्ष इतक्या रुपयांचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेच्या कार्यवाहीसाठी शासनास सादर करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे

दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, येथील CT-Scan मशीन जुनी झाल्यामुळे ती वारंवार बंद पडत असल्याने मशीन खरेदी साठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही अद्याप सदर मशीन खरेदी केली नसल्याने मशीन खरेदीची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून नविन मशीन उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, येथे (१) शल्यचिकित्साशास्त्र-०२ (२) नेत्रचिकित्साशास्त्र ०२ (३) काननाक व घसा शास्त्र ०१ या मोडयुलर ओटीचा प्रस्ताव मंजुरीसाठी दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला असून या विभागातील मोड्यूलर ओटीनां मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. हसन मुश्रीफ (१९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) स्वा.रा.ती.ग्रा.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे CT-Scan मशीन मध्ये बिघाड झाल्यामुळे ती वारंवार बंद पडत होती. परंतु सद्यः परिस्थितीत सदर सी.टी. स्कॅन मशीन सुरु करण्यात आलेली आहे.

तसेच संचालनालयामार्फत १२८ Slice C.T. Scan with contrast Incessant dual energy machine with turnkey and buy back, Make- Canon, Model-Aquilion, Prime Sp १६० Slice Ct Scan Machine- TSX३०३B मशीन करिता खरेदीचे आदेश निर्गमित करण्यात आले असून सदर मशीन प्रस्थापीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारतीचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण होताच सदर नविन सी.टी. स्कॅन मशीन प्रस्थापीत करुन रुग्णसेवेकरिता सुरु करण्यात येईल.
(३) हे खरे आहे.
(४) संस्थेमार्फत दिनांक १९ एप्रिल, २०२५ अन्वये प्राप्त (१) शल्यचिकित्साशास्त्र-०२ (२) कान, नाक व घसाशास्त्र ०१ या मॉड्युलर ओटीचा सुधारित प्रस्ताव संचालनालयास विहित नमुन्यात सादर करणेबाबत कळविण्यात आले असून सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तपासून सदरबाबत योग्य निर्णय घेण्यात येणार आहे.
(५) लागू नाही.

---

## शासनाने राज्यातील सर्व समाजातील विद्यार्थिनींसाठी उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमांत मोफत शिक्षणाच्या केलेल्या घोषणेबाबत

**(१६) ९४८५ (०८-०९-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व समाजातील विद्यार्थिनींसाठी उच्च शिक्षणातील ६४२ अभ्यासक्रमांत शिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाईल, अशी घोषणा शासनाने माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत काही शिक्षण संस्थांकडून विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ३४ (14)

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०४-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ८ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार, मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process- CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा मुलींसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) तंत्र शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी परिपत्रकाद्वारे, विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत संस्थांकडून सक्ती करण्यात येत असल्यास, याबाबत मुलींना शासनास किंवा संचालनालयास तक्रार करण्याकरीता हेल्पलाईन नंबर दिले आहेत आणि शैक्षणिक संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची विद्यार्थिनींना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

तसेच, तंत्र शिक्षण संचालनालयास विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार संस्थास्तरावरुन ४,५०१ विद्यार्थिनींना आकारण्यात आलेले एकूण शिक्षण शुल्क रक्कम रु. १३,०८,८६,५७०/- परत करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाकडून निर्गमित केलेल्या परिपत्रक व पत्रांद्वारे सर्व विभागीय सहसंचालक आणि अकृषी विद्यापीठांना, शिक्षण संस्थांकडून विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले असल्यास कारवाई करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महात्मा फुले विकास महामंडळांमार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द तसेच सफाई कामगारांना व्यवसाय तसेच उच्च शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ९४९२ (२०-०७-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले विकास महामंडळांमार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द तसेच सफाई कामगार बेरोजगारांना व्यवसाय तसेच उच्च शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामंडळात अनेक गरजू लोकांनी विविध योजनेंतर्गत कर्ज मिळण्यासाठी अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर कार्यालयात गत दोन ते तीन वर्षापासून १७१ अर्ज अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे महात्माफुले मागासवर्ग विकास महामंडळातील गैरकारभारामुळे सुशिक्षित बेराजगारांची दिशाभूल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त महामंडळातील गैर कारभार रोखण्याबाबत तसेच सुशिक्षित बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०३-१२-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

३६ जिल्ह्यात जिल्हा कार्यालय व विभागीय स्तरावर प्रादेशिक कार्यालये कार्यरत आहेत.

(३) एनएसएफडीसी योजनेंतर्गत नागपूर कार्यालयात शैक्षणिक कर्ज प्रकरंणाकरिता एकूण १३ कर्ज प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. मुख्यालय स्तरावरून सदरच्या कर्जप्रकरणाचे LOI मागणी राष्ट्रीय महामंडळास करण्यात आलेली आहे.

एनएसएफडीसी, नवी दिल्ली LOI मंजूरी करीता प्रलंबित आहे.

(४) हे खरे नाही.

सुशिक्षित बेरोजगारांची दिशाभूल होत नाही. यापूर्वी दिनांक १० जून, २०१९ रोजी शासनाने दिलेली शासन हमीची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत संपुष्टात आल्याने उच्च शैक्षणिक कर्ज योजना राबविण्याकरिता तसेच योजनेकरिता वेळेवर निधी उपलब्ध होण्याकरिता राज्य शासनाने राष्ट्रीय महामंडळास दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी एनएसएफडीसी, नवी दिल्ली व एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांचे Predutial norms अन्वये

१. राज्य शासनाकडून आवश्यक असलेले कर्जाच्या रकमेप्रमाणेशासन हमीची पूर्तता करणे.

२. एक वर्षापेक्षा जास्त कालावधीची थकीत रक्कम भरणा करणे.

३. १०० टक्के उपयोगिता प्रमाणपत्र देणे प्राप्त वरिलपैकी राज्य शासनाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ अन्वये रु.६००.०० कोटींची शासन हमी एनएसएफडीसी, व एनएसकेएफडीसी नवी दिल्ली यांना दिलेली आहे. परंतु तदनंतर राष्ट्रीय महामंडळाकडून

AMRCD अंतर्गत दोन्ही महामंडळांना थकीत असलेली वसुलीची रक्कम अदा करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) १. सदर योजनेकरिता वेळेवर निधी उपलब्ध होण्याकरिता राज्य शासनाने राष्ट्रीय महामंडळास दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.६०० कोटींची शासन हमी उपलब्ध करून दिलेली आहे.

२. परंतु आता दोन्ही राष्ट्रीय महामंडळाकडून More than one year dues निधी महामंडळाकडून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात गटई स्टॉल योजनेची जनजागृती होत नसल्याबाबत.

**(१८) ९४९३ (२०-०७-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चर्मकार समुदायातील मोचीसाठी गटई स्टॉल योजना राबविली जात असून या योजनेत टिन स्टॉलच्या उभारणीसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची जनजागृती होत नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

वि.स. ३४ (16)

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२०-११-२०२५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सर्व संबंधित यांचेकडून सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी, जिल्हा माहिती कार्यालयाकडून योजनेशी संबंधित माहिती पत्रिका व स्थानिक बसस्थानकावर योजनेशी संबंधित जिंगल्स याद्वारे योजनेची  प्रसिध्द केली जाते. तसेच गावागावांमध्ये संबंधित कार्यालयामार्फत प्रेस नोट, बॅनर, चित्ररथाद्वारे जाहीरात दिली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुंबेफळ (ता. केज. जि. बीड) येथील (MIDC) औद्योगिक वसाहतीबाबत.**

**(१९) ९४९७ (१४-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंबेफळ (ता.केज, जि.बीड) येथील MIDC साठी १७.१३ हेक्टर जमीनीचा प्रस्ताव होता परंतू त्यातील गावठाणसाठी व शाळा, विद्युत उपकेंद्रसाठीची जागा कमी करून बाजार मूल्य दुय्यम निबंधक, केज. यांचेकडून मागविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रस्ताव शासनाच्या उच्चधिकार समिती समोर सादर करून मंजुरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे कुंबेफळ (ता.केज,जि.बीड) येथील १७.१३ हेक्टर आर क्षेत्रामधून गावठाण,शाळा, विद्युत उपकेंद्रा इत्यादी प्रयोजनासाठीची जागा वगळता प्रस्तावित कुंबेफळ औद्योगिक क्षेत्राकरीता १२.० हेक्टर आर क्षेत्राचे मुल्यांकन सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २२ मार्च, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

मौजे कुंबेफळ (ता.केज,जि.बीड) येथील प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राच्या अनुषंगाने सदर क्षेत्रातील भूखंड वाटपाचा दर, उपलब्ध भूखंड, भूखंडांना येणारी मागणी तसेच प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राच्या सुसाध्यतेबाबतचा अहवाल महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम,१९६१ अन्वये भूसंपादनाची पुढील कार्यवाही मऔवि महामंडळाकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसमधील प्रवाशांना अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(२०) ९५२० (०७-१०-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील शिवशाही बसमधील प्रवास सुविधांबाबत नाराजी दिवसागणिक वाढत असून एसटीच्या वातानुकुलीत सेवेसाठी जादा पैसे भरूनही प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डहाणू (जि.पालघर) येथील एसटी महामंडळाच्या ताफ्यातील मुंबई – अहमदाबाद महामार्गावर धावत्या शिवशाहीच्या टपाचा भाग उडाल्याचा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिवशाही बसेसमध्ये बंद पडलेली वातानुकुलीत यंत्रणा, मळके पडदे, फाटलेली आसन कव्हर आणि कापूस निघालेली आसने इत्यादींमुळे प्रवाशांची गैरसोय होत असून प्रवासामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण पसरलेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिवशाही बसेस मधील प्रवाशांना अद्ययावत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२७-०१-२०२६) :** (१), व (२) नाही.
(३), (४) व (५) शिवशाही वाहनांमध्ये वातानुकुलित यंत्रणा, बॉटल होल्डर, मॅगझीन पाऊच, पडदे, मोबाईल चार्जिंग सॉकेट व रिक्लायनिंग सीट या प्रकारच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. शिवशाही बसेसमधील वातानुकुलीत यंत्रणेची नियमित त्रैमासिक देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. याव्यतिरिक्त चालकाने, यांत्रिकाने वातानुकुलित यंत्रणेसंबंधीत दोष निदर्शनास आणून दिल्यास त्याची त्वरीत दुरूस्ती करण्यात येते.

---

**पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये वाचनालय उभारणीत होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२१) ९५२३ (२९-०९-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात ८०० हून अधिक ग्रामपंचायती असून यांमध्ये वाचनालय सुरु करण्यासाठी निधीची तरतूद असतानाही अनेक ग्रामपंचायतींच्या हद्दीत अद्याप वाचनालय सुरु झालेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाचनालय उभारणीसाठी लोकसंख्या कमी असलेल्या ग्रामपंचायतींसाठी ५ ते १० लाख तर जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना ५० लाख रुपयांपेक्षा अधिकचा निधीची दरवर्षी तरतूद केली जाते,

हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधीच्या तरतूदीचा वापर ग्रामपंचायती वाचनालया ऐवजी इतर विकासकामांमध्ये करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या ग्रामपंचायतींमध्ये वाचनालय सुरु करण्यात आली आहेत, त्यामध्ये आवश्यक पुस्तकांची कमतरता तसेच इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्यामुळे वाचनप्रेमी व विद्यार्थी हे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वाचनालय उभारणीसाठी करण्यात आलेली तरतूद वाचनालय उभारणीसाठीच व्हावी त्याचप्रमाणे या वाचनालयांमध्ये सुयोग्य सोयी- सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) नाही, हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यात ४७३ ग्रामपंचायती आहेत. ग्रामपंचायतीमध्ये वाचनालय उभारणीसाठी शासनाकडून तसेच, जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत ग्रामपंचायतींना कोणताही निधी दिला जात नाही. त्यामुळे वाचनालयासाठी दिलेला निधी इतर विकास कामांसाठी वापरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात ०२ शासन मान्य सार्वजनिक ग्रामपंचायत ग्रंथालये असून त्यांना त्यांच्या दर्जा / वर्गानुसार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील ग्रंथालय संचालनालयामार्फत नियमानुसार सहायक अनुदान देण्यात येते. सदर दोन्ही ग्रंथालयांमध्ये नियमानुसार ग्रंथसंपदा आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवराबोडी (जि. चंद्रपूर) येथील उपसा सिंचन कालव्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी जाताना ट्रॅक्टर चालक कामगाराचा आकस्मिक मृत्यू झाल्याबाबत**

**(२२) ९५५२ (१९-०९-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवराबोडी (जि.चंद्रपूर) येथील मोखाबर्डी उपसा सिंचन कालव्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असून चिचाळा कुणबी येथील श्री.प्रशांत मधुकर येवले हा ट्रॅक्टर चालक कामगाराचा कामाच्या ठिकाणी जात असताना आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित कंपनीच्या मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर दुर्घटनेतील मृत झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१६-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

जवराबोडी, जि. चंद्रपूर येथील मोखाबर्डी उपसा सिंचन कालव्याच्या बांधाकामाचे काम सुरू असताना दिनांक ०५ एप्रिल, २०२५ रोजी कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांच्यामार्फत उपसा सिचंन कामाच्या संधानक

कामाकरीता अभिसादनाची जबाबदारी सोपविलेले श्री. प्रशांत मधुकर येवले (वय वर्षे ४८) ट्रॅक्टर चालक यांचा मृत्यू झाला आहे.

(२) होय, जवराबोडी, जि. चंद्रपूर येथील मोखाबर्डी उपसा सिंचन कालव्याच्या बांधाकामाचे तसेच निचरा नालीचे काम डिसेंबर २०२४ पासून सुरू असून सदरचे काम हे कार्यकारी अभियंता अंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर, जि. नागपूर यांनी त्यांच्या दिनांक २० ऑगस्ट, २०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन, अे-१५, व्यंकटेश नगर, के.डी.के. कॉलेज जवळ, नंदनवन, नागपूर ४४०००९ यांना दिले आहे.

कंत्राटदाराच्या वतीने जवळपास १० कामगारांच्या सहाय्याने डिसेंबर २०२४ पासून सदर काम करण्यात येत होते. सदर उपसा सिचंन कामाच्या संधानक कामाकरीता अभिसादनाची जबाबदारी सोपविलेले श्री. प्रशांत मधुकर येवले, वय वर्षे ४८ हे ट्रॅक्टर चालक दिनांक ०५ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास निपचित पडलेले इतर कामगारांना दिसून आले. श्री. येवले यांना शंकरपूर, जि. चंद्रपूर येथील सरकारी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी रात्री सुमारे ८.३० च्या सुमारास श्री. येवले यांना मृत घोषित केले.

सदर घटनेबाबत पोलिस स्टेशन, भिसी, जि. चंद्रपूर येथे दिनांक ०६ एप्रिल, २०२५ रोजी आकस्मिक मृत्यु खबरी क्र.०५/२०२५ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

संबंधित क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांच्या विरुद्ध किमान वेतन अधिनिमय, १९४८ व महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ अंतर्गत खटला क्र. C २०२५००००१ तर वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व महाराष्ट्र वेतन प्रदान नियम, १९६३ अंतर्गत खटला क्र. C२०२५००००२ असे दोन खटले दाखल केलेले आहेत. सदर खटले न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगारांचे नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगारांचे नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अंतर्गत खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) मयत कामगाराच्या वारसादारास नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याकरीता कामगार न्यायालय तथा आयुक्त कर्मचारी नुकसान भरपाई, चंद्रपूर तसेच कार्यकारी अभियंता, अंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर, जि. नागपूर यांनी कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांना उचित कार्यवाही करण्याकरीता कळविण्यात आले आहे.

मयत कामगार श्री. प्रशांत येवले यांच्या मृत्यूप्रकरणी कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांच्या कडून रु.१,५०,०००/- (अक्षरी रुपये दीड लाख फक्त) इतक्या रकमेचा धनादेश (क्र.१७६३५९) व रोख स्वरुपात रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) असे एकूण रु. १,६०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख साठ हजार) वारसदार पत्नी श्रीमती दुर्गा प्रशांत येवले यांना अदा करण्यात आलेले आहेत.

कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांनी कर्मचारी भरपाई पॉलिसी ही विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांच्याकडून घेतली आहे.

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांच्या दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रानुसार सदर प्रकरणाच्या अनुषंगाने कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांच्याशी संपर्क साधण्यात आला असून अद्याप सदर प्रकरणी मा. कामगार न्यायालयामध्ये दावा दाखल झालेला नसून दावा दाखल झाल्यानंतर मा, कामगार न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

कंत्राटदार मे. प्रगती कंस्ट्रक्शन यांनी सदर प्रकरणाची आवश्यक कागदपत्रे सादर केली असून मृतक श्री. प्रशांत येवले यांच्या वारसादारामार्फत मा. कामगार न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलुंड येथील केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळाली नसल्याने पक्षीगृहाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ९६८५ (१८-०८-२०२५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलुंड येथे लवकरच पक्षीगृह उभारण्यात येणार असून संग्रहालयाला केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळाली नसल्याने पक्षीगृहाचे काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पूर्व उपनगरातील नागरिकांना आणखी काही दिवस पक्षीगृहासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुलुंड येथे प्रस्तावित पक्षीगृहाच्या उभारणीसाठीचा प्रस्ताव जुलै, २०२४ मध्ये केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्राधिकरणामार्फत प्रस्तावास जानेवारी, २०२५ मध्ये तत्वतः मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्राधिकरणाने काही अटी व शर्तीची पूर्तता करून सुधारित प्रस्ताव पुन्हा सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे नाही. मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलुंड येथे पक्षीगृह उभारण्याकरिता, सल्लागार यांच्यामार्फत रेखाचित्रे, अंदाजपत्रके, मसुदा निविदेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रस्तावास केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची तत्वतः मंजुरी प्राप्त झाली असून काही बाबींची पूर्तता करून लवकरच पुनः प्रस्ताव केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणास सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कृष्ठरोग निर्मुलनासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२४) ९७१२ (३०-०७-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृष्ठरोग निर्मुलन मोहीम अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात दिनांक ३१ जानेवारी, ते १५ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत कृष्ठरोग शोध कार्यक्रम राबविण्यात आला असून त्यात जिल्ह्यातील जवळपास ६ लाख कुटुंबांचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हेक्षणात जिल्ह्यात कृष्ठरोगाचे रुग्ण आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील कृष्ठरोग निर्मुलनासाठी शासनाने कोणत्या सक्षम उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२५-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ३१ जानेवारी, ते १५ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत राज्यातील अतिकुष्ठरुग्ण भार असलेल्या २० जिल्हयात कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात आले. यामध्ये यवतमाळ जिल्हयातील ६,३७,४१० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

(२) या सर्वेक्षणात राज्यात एकूण ३८२६ नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले. त्यापैकी २३३ नवीन कुष्ठरुग्ण यवतमाळ जिल्हयातील होते. त्या सर्वांना बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला.

(३) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व राज्यस्तरावरील नाविण्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावरुन व जिल्हास्तरावरुन कार्यक्षेत्रामध्ये नियमितपणे संनियंत्रण केले जाते.

कुष्ठरोगाच्या निर्मुलनासाठी कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• विविध माध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती देऊन कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वत:हून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

• दरवर्षी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान दिनांक ३० जानेवारी, रोजी राबविण्यात येते. याद्वारे प्रत्येक गावात कुष्ठरोगाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येते.

• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्यामार्फत संशयित रुग्ण शोधण्यात येतात. निदाननिश्चिती झाल्यानंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.

• नवीन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व पात्र सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीचा एक डोस दिला जातो.

• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते व त्यांच्यामधील कुष्ठरोग संशयित रुग्ण शोधण्याच्या अनुषंगाने तपासणी केली जाते.

• सन २०१६-१७ पासून दरवर्षी राज्यात "कुष्ठरुग्ण शोध मोहिम" राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात आला आहे.

• शुन्य कुष्ठरुग्ण असणाऱ्या गावामध्ये कुष्ठरोग कार्यक्रमात असणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून सर्वेक्षण व त्वरीत संशयित तपासणी करून आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

• कुष्ठरोग तपासणीपासून वंचित असण्याची शक्यता असल्यामुळे जोखमीचा घटक असलेल्या खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, आश्रमशाळा, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार, विस्थापित लोकसंख्या इत्यादी यासारख्या जोखमीच्या भागातील लोकसंख्येचे कुसुम कार्यक्रमाअंतर्गत कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे व त्यामध्ये नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना तात्काळ औपधोपचार सुरु करण्यात आला आहे.

• हयात असलेल्या सर्व नव्या व जुन्या कुष्ठरुग्णांच्या घरी भेट देऊन कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत सहवासितांची तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. ३४ (22)

## वणी (जि.यवतमाळ) पोलीस स्टेशन येथे पोलीस कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासह नवीन पदे निर्माण करण्याबाबत .

**(२५) ९७१५ (०७-०८-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) पोलीस स्टेशन अंतर्गत ५४ गावे असून शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेले पोलीसांचे संख्याबळ कमी पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शहरातील मंजूर ८२ पदे असतांना त्यातील २७ कर्मचाऱ्यांची संख्या कमी असून, वणी शहराचा विकास झपाट्याने होत असतांना तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे येथे सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या ५५ पोलीस कर्मचाऱ्यांवर येथील कायदा व सुव्यवस्था राखणे अत्यंत जिकरीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने रिक्त असलेली पदे तातडीने भरण्यासह नवीन पदे निर्माण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही,

वणी (जि. यवतमाळ) पोलीस स्टेशन अंतर्गत वणी शहरासह एकूण ५६ गावे समाविष्ठ आहेत. वणी पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी व अंमलदार यांची एकूण ९० पदे मंजूर असून त्यापैकी ८० पदे भरलेली व १० पदे रिक्त आहेत. यवतमाळ घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या एकूण मनुष्यबळाचे वर्गीकरण करुन प्रत्येक पोलीस स्टेशनला मंजूर मनुष्यबळानुसार पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात येते. तसेच यवतमाळ पोलीस मुख्यालय, इतर उपविभाग व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार आवश्यकतेनुसार पोलीस स्टेशन, वणी येथे उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) पोलीस भरती प्रक्रिया राबवून यवतमाळ घटकामध्ये उपलब्ध झालेल्या पोलीस अंमलदारंची मंजूर मनुष्यबळानुसार पोलीस स्टेशनला नेमणूक करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वणी (जि.यवतमाळ) शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्ती आणि देखभालीबाबत

**(२६) ९७४५ (०८-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी शहरातील (जि.यवतमाळ) सुमारे सहा हजाराहुन अधिक पथदिव्यांच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी पालिकेकडे दोन कुशल व अकुशल कर्मचारी कार्यरत असून अपु-या मनुष्यबळामुळे शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीस विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक भागात रात्रीच्या वेळी पथदिवे बंद असल्यामुळे अपघात, चोरी व इतर गैरप्रकारांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालिकेने त्वरित अतिरिक्त मनुष्यबळाची भरती करुन पथदिव्यांच्या देखभालीची कार्यक्षम व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी वारंवार स्थानिक नागरीकांकडून पालिका प्रशासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
तथापि, वादळी व पावसाळी हवामानात विद्युत पथदिवे बंद पडल्याच्या तक्रारी नगरपरिषद कार्यालयास प्राप्त झाल्यावर सदर पथदिव्यांची दुरुस्ती करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरात वन विभागातील सर्व प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत

**(२७) ९७५६ (२१-०७-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात वन विभागाच्या जागेवर २२ गृहनिर्माण संस्थेसंदर्भात बैठका घेऊन तत्काळ कारवाई करण्याच्या सूचना मा.वने मंत्री महोदयांनी विभागीय वन अधिकाऱ्यांना (पुणे) दिली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गृहनिर्माण संस्थेसंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव मागवून त्यावर निर्णय घेण्याचे आश्वासनही मा.वने मंत्री महोदयांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन विभागातील सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१२-०१-२०२६) :** (१), (२) व (३) मौजे मजरेवाडी, ता.उत्तर सोलापूर येथील राखीव वन सर्व्हे क्र. ५९० ते ५९४ मधील ८३.१४ एकर क्षेत्र महसूल विभागाद्वारे २२ गृहनिर्माण संस्थांना सन १९७१ ते १९७३ मध्ये वाटप करण्यात आले आहे. तथापि, सदर क्षेत्राचे निर्वणीकरण झालेले नसल्यामुळे क्षेत्राचा वैधानिक दर्जा हा राखीव/ संरक्षित वन कायम आहे.
प्रस्तूत प्रकरणी मा. मंत्री(वने) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी बैठक संपन्न झाली. आता, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल रिट याचिका क्र.३०१/२००८ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १५ मे, २०२५ रोजी पारित केलेल्या अंतिम आदेशास अनुलक्षून शासन निर्णय दिनांक ०५ सप्टेंबर, २०२५ अन्वये वाटप वनक्षेत्राबाबत चौकशी करण्यासाठी राज्यस्तरावर मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समिती आणि प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आले आहे. त्यानुसार महसूल विभागाच्या ताब्यातील वाटप वनक्षेत्राबाबत जिल्हास्तरीय समितीव्दारे शिफारस प्राप्त झाल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मंद्रूप एमआयडीसी होटगी लॉजिस्टिक पार्क आणि इतर उद्योग उभारून येथे रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२८) ९७६४ (१९-०९-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मंद्रूप एमआयडीसी, होटगी लॉजिस्टिक पार्कसह विविध प्रश्नावर मा.उद्योग मंत्री यांच्याकडे बैठक होऊनही मान्य केलेल्या सर्व मागण्या प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मंद्रूप एमआयडीसी, होटगी लॉजिस्टिक पार्क आणि इतर उद्योग उभारून येथे रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) अशंत: खरे आहे.

मौजे होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर येथील पाटबंधारे विभागाची २०.० हे.आर जमीन लॉजिस्टिक पार्क उभारण्याकरीता पाटबंधारे विभागाच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी त्यांच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये, मौजे होटगी येथील २०.० हे.आर क्षेत्रात लॉजिस्टिक पार्क ऐवजी आयटी पार्क उभारण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या १८० व्या बैठकीत मौजे होटगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील २० हे.आर क्षेत्रावर आय.टी.पार्क उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ नुसार भुसंपादनाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात शासकिय जमिनीवर बेकायदेशीर बांधकामे केल्याबाबत**

**(२९) ९८१२ (२०-०७-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात शासकीय जमिनीवर बेकायदेशीर बांधकामे, कब्जा व खोटया कागदपत्राद्वारे परवानगी घेणे या पार्श्वभूमीवर संपूर्ण शासकीय जमिनीचे सर्वेक्षण करुन कार्यवाहीसाठी धोरण निश्चीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने स्थानिक मा.लोकप्रतिनिधींच्या पत्राच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-११-२०२५) :** (१), (२) व (३) मा. श्री रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी शासकीय जमिनीचे सर्वेक्षण करुन कार्यवाहीसाठी धोरण निश्चित करणेबाबत पत्रव्यवहार केला आहे.

मा. श्री रईस शेख, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी यांनी मंडळ अधिकाऱ्यांमार्फत भिवंडी तालुक्यातील शासकीय जमिनीची व त्यावरील अनधिकृत बांधकामांची माहिती संकलित करून शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेचे निर्देश मंडळ अधिकारी व गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

तसेच तहसिलदार, भिवंडी यांनी त्यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासकीय जमिनीवर झालेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरिता शासकीय जमिनीची मोजणी होऊन हद्दी निश्चित होणे आवश्यक असल्याने कालबद्ध कार्यक्रम निश्चित करुन शासकीय जमिनीची मोजणी करुन हद्द निश्चित करणेबाबत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी यांना कळिवले आहे.

मौजे कळंबोली ता. भिवंडी येथील स.नं. १७ या शासकीय आकारी पडीत जमिनीवरील अनधिकृत बांधकाम तहसीलदार भिवंडी यांच्या दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी आदेशाच्या अनुषंगाने उपअधिक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी यांनी सादर केलेल्या मोजणी नकाशानुसार दिनांक २३ मे, २०२५ व दिनांक ०९ जून, २०२५ रोजी पोलिस बंदोबस्तामध्ये निष्कासित करण्यात आले आहे. तसेच तहसीलदार, भिवंडी यांनी सन २०१८ ते १९ जून, २०२५ या कालावधीत शासकीय जमिनीवरील एकूण २५८ अनधिकृत बांधकामे निष्काषित केली आहेत.

तसेच अनधिकृत बांधकामे करताना खोट्या कागदपत्रांच्या आधारे परवानगी मिळवली आहे किंवा कसे याबाबत तपासून कार्यवाही करण्याबाबत तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक १९ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक संचालक नगररचना, ठाणे यांना कळविले होते.

त्यानुषंगाने सहा.संचालक, नगररचना ठाणे यांनी दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर जागेवर कोणत्याही परवानगीची शिफारस करण्यात आली नाही, असे कळविले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदरहू सरकारी जमिनीस बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

शासकीय जमीनीवर अतिक्रमण केलेल्या अतिक्रमणधारकांवर (रहिवास वगळता) त्वरीत गुन्हा दाखल करणेबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी तहसीलदार, भिवंडी व तहसीलदार, शहापुर यांना दिनांक २४ जून, २०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

## राज्यातील नवीन वैद्यकीय महाविद्यालयांत निवड झालेल्या प्राध्यापकांची नियुक्ती प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ९९१९ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार, परभणी व धाराशिव या जिल्ह्यांमध्ये नव्याने स्थापन झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या नियुक्त्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) निवड केलेल्या जवळपास ४८ उमेदवारांना अद्याप नियुक्ती, मिळाल्याचे निदर्शनास आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या उमेदवारांची निवड कधी केली होती आणि त्यांना नियुक्तीसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे शिफारस केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,त्यानुसार या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची तातडीने नियुक्ती व्हावी यासाठी वैद्यकीय शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यात समन्वय स्थापित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :** (१) ते (३) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार, परभणी व धाराशिव या जिल्ह्यांमध्ये नव्याने स्थापन झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापक संवर्गातील मंजूर व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| **संस्था** | **मंजूर पदे** | **भरलेली** | **रिक्त** |
|---|---|---|---|
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छ.संभाजीनगर | २१५ | १८६ | २९ |
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार | ८९ | ६० | २९ |
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी | ८३ | ५३ | ३० |
| शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशीव | ८५ | ५९ | २६ |

राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तसेच सहाय्यक प्राध्यापक (वर्ग-२) या संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्तपदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिराती प्रसिध्द करण्यांत आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त होत असून, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.
(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने त्यांच्या अधिनस्त राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत आयुर्वेद व परिचर्या महाविद्यालये या महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालये व महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक व अशैक्षणिक संवर्गातील डॉक्टरांची सरळसेवेच्या कोटयातील पदे पदांवर उमेदवारांची भरती करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळात पूर्णवेळ अध्यक्षांची नियुक्ती करण्याबाबत

**(३१) ९९३४ (०७-१०-२०२५). डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ३४ (27)

(१) राज्य परिवहन महामंडळ आर्थिक संकटात सापडले असून ७००० कोटींची देणी प्रलंबित असून या मंडळाच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याकरिता पूर्णवेळ अध्यक्षही नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळात अध्यक्ष नसल्याने मंजूरीअभावी २५ पेक्षा जास्त नस्ती निर्णयाविना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळात अध्यक्षांची नियुक्ती करुन नस्ती निकाली काढण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०२-२०२६) :** (१), (२), (३) व (४) शासन अधिसुचना दि ०९ एप्रिल, २०२५ अन्वये मा. मंत्री (परिवहन) यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली आहे.

---

**पुणे मेट्रोच्यावतीने उद्योगनगरीतील निगडी -मुकाई चौक - वाकड व रावेत ते औंध बीआरटी पर्यंत नवीन मेट्रो लाईनचा प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करून केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेबाबत**

**(३२) ९९६३ (०८-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे मेट्रोच्या वतीने पिंपरी ते निगडी पर्यंत मेट्रो महामार्गाच्या विस्तारीकरणास मान्यता मिळवून भूमिपूजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योगनगरीतील वाढत्या वाहतूक समस्यांवर उपाययोजना करण्याकरिता वाकड ते चाकण या मार्गावर मेट्रो सुरु करण्याबाबत तत्कालीन स्थानिक लोक प्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी त्या सुमारास पत्राद्वारे मागणी केली होती हे ही,खरे आहे काय,
(३) तसेच उद्योगनगरीचे वाढते नागरीकरण व भविष्यातील वाहतुकीच्या समस्येवर उपाययोजना करण्याकरिता निगडी -मुकाई चौक - वाकड या मार्गाचे व रावेत ते औंध बीआरटी या दोन्हीही मार्गाचा पुणे महामेट्रोच्या वतीने नवीन मेट्रो लाईन टाकण्याबाबत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याबाबत कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त दोन्हीही मेट्रो मार्गाचा डीपीआर मान्यतेकरिता केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) महामेट्रोमार्फत निगडी-मुकाई चौक - वाकड-चाकण या मेट्रो मार्गीकेबाबतचा मसुदा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पिंपरी चिंचवड महानगर पालिकेला सादर करण्यात आला होता. तद्नंतर दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मा. उपमुख्यमंत्री यांनी सुचविलेले सुधारणा तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या पुमटा (PUMTA) बैठकीत सुचविलेल्या सुधारणा यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मध्ये समावेश करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मान्यतेकरीता सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच रावेत ते औंध बीआरटी हा मार्ग सर्वकष वाहतूक आराखडा-२०२४ (CMP) मधील यूनिवर्सिटी चौक ते देहू रोड या प्रस्तावित मेट्रो मार्गीकेच्या संरेखनामध्ये अंतर्भूत आहे. वाहतूक अंदाजांच्या आधारे सदरील मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पुढील टप्प्यात तयार करण्यात येईल.

---

## शालेय पोषण आहारात मशरूम (सुपरफुड) समाविष्ट करण्याबाबत

**(३३) ९९९६ (२४-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय शालेय शिक्षण विभाग, नवी दिल्लीचे सह सचिव श्री. मीना यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या दरम्यान महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना शालेय पोषण आहारात सुपरफुड म्हणून मशरूमचा समावेश करण्याबाबतचे पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी लाभदायक असलेल्या मशरूमचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय पोषण आहारात मशरूमच्या वापराबाबत शासनाकडे माहिती उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मशरूमचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

(४) प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यात ९५.५० लक्ष विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येत आहे. दिनांक १५ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीने प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मार्यादा विचारात घेऊन १२ पाककृती सुचविलेल्या आहेत.

दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानूसार पाककृतींमध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार १२ प्रकारच्या पाककृतींच्या स्वरुपात पोषण आहाराचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. वरील विद्यार्थी संख्येस स्थानिक पातळीवर मशरुम उपलब्ध करुन देण्याकरिता मोठ्या प्रमाणात अतिरिक्त निधीची आवश्यकता भासणार असून अतिरीक्त निधीची तरतूद करावी लागेल. सदर १२ पाककृतीमध्ये मशरुमचा समावेश करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) शहरातील एचएससी वसाहतीमधील गुन्हेगारी रोखून वसाहतींचे सुशोभिकरण किंवा पुनर्विकास करण्याबाबत

**(३४) १००३० (१९-०९-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या एचएससी वसाहती शेजारील पोलीस कर्मचाऱ्यांच्या तीन कौलारु चाळीची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू चाळीत एकूण ४८ घरे असून, भोवतालच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे तसेच तेथे कोणीही राहत नसल्याने चरस-गांजा ओढणाऱ्या व्यक्ती व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा वावर वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदरील पोलीस वसाहतीतील होणारी गुन्हेगारी रोखून वसाहतींचे सुशोभिकरण किंवा पुनर्विकास करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०२६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सदरहू चाळीत एकुण ४७ घरे असुन १५ शासकीय निवासस्थाने जमिनदोस्त केली आहेत. यातील ३२ शासकीय निवासस्थाने राहण्यास अयोग्य असल्याने ही निवासस्थाने निष्कासित करून वॉल कंपाउंड बांधणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग भिंगारी, पनवेल यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील केज उपविभाग कार्यालय अंतर्गत कार्यरत कर्मचारी कामात दुर्लक्षपणा व हलगर्जीपणा करत असल्याबाबत

**(३५) १००६६ (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील केज उप विभाग कार्यालय अंतर्गत कार्यरत श्री.उमेश ज्ञानेश्वर भोईर (सहाय्यक अभियंता) अतिरिक्त कार्यभार मस्साजोग यांचे कार्य महावितरण कंपनीचे नुकसान व जनमानसात कंपनीची प्रतिमा मलीन करणारे असल्याने त्यांना सेवेतून निलंबित करण्याची शिफारस दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केज उपविभाग कार्यालय अंतर्गत नांदूरघाट कक्ष मध्ये कार्यरत तंत्रज्ञ, श्री.विशाल नागरगोजे, श्री.आकाश दिलीप गलांडे व श्री.विश्वास रोडे हे कामामध्ये नेहमी दुर्लक्षपणा व हलगर्जीपणा करीत असल्यामुळे त्यांची बदली करण्याचा प्रस्ताव दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी त्वरित कार्यवाही करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता, महावितरण, लातूर यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २०२५ व २० मे, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यस उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री. उमेश ज्ञानेश्वर भोईर, सहाय्यक अभियंता यांच्या दैनंदिन कामकाजीतील हलगर्जीपणा व निष्काळजीपणामुळे त्यांना दिनांक २० मे, २०२५ पासून महावितरण कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे व त्याअनुषंगोन पुढील शिस्तभंग कार्यवाही सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे. सक्षम अधिकारी यांनी केज उपविभागांतर्गत नांदूरघाट कक्ष येथे कार्यरत असणारे तांत्रिक कर्मचारी श्री. आकाश दिलीप गलांडे, वरिष्ठ तंत्रज्ञ व श्री. विश्वास अशोकराव रोडे, तंत्रज्ञ यांच्या प्रशासकीय बदल्या अंबाजोगाई विभागीय कार्यालयांतर्गत रिक्त असणाऱ्या इतर शाखा /उप विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे. सक्षम अधिकारी यांचे कडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) होय, श्री. उमेश ज्ञानेश्वर भोईर, सहाय्यक अभियंता, श्री. विशाल नागरगोजे, वरिष्ठ तंत्रज्ञ, श्री. आकाश दिलीप गलांडे, वरिष्ठ तंत्रज्ञ व श्री. विश्वास रोडे, तंत्रज्ञ यांच्यावर सक्षम अधिकारी यांचेमार्फत शिस्तभंग कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) लागू नाही.

---

## बीड जिल्ह्यातील केज उपविभाग कार्यालय अंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) १००८२ (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील केज उपविभाग कार्यालय अंतर्गत ४ पदे, अंबाजोगाई ग्रामीण शाखेतील १ पद व नेकनूर येथे १ अशी एकूण ६ पदे भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केज उपविभाग कार्यालय व बीड विभागाच्या अधिपत्याखालील नेकनूर शाखा कार्यालय येथे नियमित सहाय्यक अभियंता यांची पदस्थापना करण्यात आली आहे. तसेच नांदुरघाट शाखा कार्यालय व आंबेजोगाई ग्रामीण शाखा क्र.०१ या ठिकाणी नियमित कनिष्ठ अभियंता यांची पदस्थापना करण्यात आली आहे.

कनिष्ठ अभियंता, केज उपविभागीय कार्यालय व सहाय्यक अभियंता, मस्साजोग शाखा कार्यालय यांचा अतिरिक्त कार्यभार अनुक्रमे कनिष्ठ अभियंता, नंदुरघाट शाखा व सहाय्यक अभियंता,केज उपविभाग यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे पूर्व मधील सोसायटी आणि झोपडपट्टी वस्तींच्या क्षेत्रांमध्ये केले जाणारे पाणीपुरवठा आणि स्वच्छता सेवेबद्दल

**(३७) १००९४ (०८-०९-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ३४ (31)

(१) शासनाने वांद्रे पूर्व मधील सोसायटी आणि झोपडपट्टी वस्तींच्या क्षेत्रांमध्ये पुरेसा पाणीपुरवठा आणि स्वच्छता सेवा सुनिश्चित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी क्षेत्रांमध्ये पाइपलाइनने पाणीपुरवठा एकूण किती घरांकरिता केलेला आहे,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन वांद्रे पूर्व मधील झोपडपट्टी क्षेत्रांमध्ये कचऱ्याची विल्हेवाटआणि गटार रचना सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) होय, शासनाने वांद्रे पूर्व मधील सोसायटी आणि झोपडपट्टी वस्तींच्या क्षेत्रांमध्ये पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित केला आहे.

(२) मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ९२ अन्वये एच/पूर्व विभागातील वांद्रे (पूर्व) याठिकाणी झोपडपट्टी क्षेत्रांमध्ये उभ्या नळखांब जलजोडणीद्वारे एकूण ४७७५ जलजोडण्या साधारणतः २३८७५ घरांकरिता देण्यात आलेल्या आहेत.

(३) वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक परिसरात एच/पूर्व विभागातील विविध खात्यांमार्फत मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत नियमितपणे कार्यवाही करण्यात येते, त्यानुसार घन कचरा व्यवस्थापन विभागामार्फत नियमित साफसफाई उपक्रमाद्वारे रस्त्यांची स्वच्छता, गर्दीच्या वेळी अतिरिक्त मनुष्यबळ आणि साफसफाईची वारंवारता वाढवणे, कचरा साचू नये म्हणून कचरा संकलन केंद्राचे निरीक्षण आणि दररोज स्वच्छता ठेवण्यात येते. तसेच, एच/पूर्व विभागातील परिरक्षण विभाग व पर्जन्य जलवाहिणी ह्या मध्यवर्ती विभागामार्फत वांद्रे पूर्व येथील झोपडपट्टी क्षेत्रात नियमीतपणे गटार रचना सुधारण्याचे काम करण्यात येते,

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खानापूर (ता. आटपाडी, जि.सांगली) मतदारसंघातील शेंडगेवाडी ही नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत

**(३८) १०२०० (२९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (ता. आटपाडी, जि.सांगली) मतदारसंघातील शेंडगेवाडी ही नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ०७ मार्च, २०२५ व दिनांक ०६ मे, २०२५ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव हे कोणत्याच ग्रामपंचायतीकडे नसल्याने त्रिशंकू असल्यामुळे गावातील नागरिकांना जन्म मृत्यू-नोंदी व इतर सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१९-०१-२०२६) :** (१) प्रश्नाधीन दिनांक ०७ मार्च, २०२५ व दिनांक ०६.०५.२०२५ ची पत्रे विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, नमूद विषयाबाबतची दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक ०६ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मागणी प्राप्त झाली आहेत.

(२) हे खरे नाही. तथापि, मौजे शेंडगेवाडी गावातील जन्म मृत्यू बाबतच्या नोंदी ग्रामपंचायत बनपूरी अंतर्गत

करणेत येत आहेत.
(३) मौजे शेंडगेवाडी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव किमान लोकसंख्येचा निकष पूर्ण करीत नसल्याने सदर प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर व आटपाडी (जि. सांगली) तालुक्यातील वेगवेगळया बंधाऱ्यांची बांधकामे करणेबाबत

**(३९) १०२०१ (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर व आटपाडी (जि. सांगली) तालुक्यातील भुगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होण्यासाठी त्यावर उपाय म्हणून दोन्ही तालुक्यात सिमेंट बांध, कोल्हापूरी बंधारे अशा प्रकारे वेगवेगळया बंधाऱ्यांची बांधकामे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधारे नादुरुस्त असल्यामुळे क्षमते इतका पाणीसाठा बंधाऱ्यामध्ये होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन नादुरुस्त बंधाऱ्याची दुरुस्ती करुन तेथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मा.लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार ०४ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून सदर कामे पूर्ण करण्यात आली आहेत व सदर चारही ठिकाणी पाणीसाठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील कमळापूर-रामापूर येथील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४०) १०२०२ (२५-०८-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील सावळज खानापूर, कमळापूर-रामापूर बलवडी प्रजिमा ७९, अडसरवाडी मोही करंजे प्रजिमा १३४, कमळापूर कार्वे बामणी मंगरुळ प्रजिमा ८० या रस्त्याची दुरवस्था झाली असून येथील पुलाचे काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही बाजूच्या रस्त्यांची अतिशय दुरवस्था झालेली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले असून खड्ड्यांमध्ये पाणी साचून वाहन चालकांना तसेच पादचाऱ्यांनाही नाहक त्रास सहन करावा लागत असून छोटे-मोठे अपघात होवून जीवित हानी होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी वाहनधारकंकडून होत असूनही संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही

केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकीत तिन्ही रस्त्यांची दुरुस्ती करुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. तसेच प्रश्नातील नमूद पुलाचे काम "सांगली जिल्ह्यातील कडेगा तालुक्यातील रा.मा. १३६ ढवळेश्वर कळंबी भाळवणी कमळापूर देवराष्ट्रे प्रजिमा ७७ कि.मी. १५/७५० मध्ये कमळापूर -रामापूर गावाजवळ मोठ्या पुलाचे बांधकाम करणे" हे सा.बां. विभाग मिरज यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत पुलाचे एकूण ५ Piers पैकी ४ Piers चे काम पूर्ण झाले आहे व उर्वरित Pier तसेच रामापूर व कमलापूर कडील Abutment चे काम प्रगतीपथावर आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) "सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील रा.मा. १३६ ढवळेश्वर कळंबी भाळवणी कमळापूर देवराष्ट्रे प्रजिमा ७७ कि.मी. १५/७५० मध्ये कमळापूर-रामापूर गावाजवळ मोठ्या पुलाचे बांधकाम करणे" या कामाचे निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील आटपाडी, खानापूर पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) १०२०८ (३०-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील आटपाडी, खानापूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी हे मुख्य पद गेल्या अनेक वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर अधिक्षक, विस्तार अधिकारी वर्ग-१, वर्ग-२, केंद्रप्रमुख, पदवीधर, उपशिक्षक, लिपीक व अन्य अशी मिळून अनेक पदे गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यादृष्टीने सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सदर पदांवर दोन अधिकारी कार्यरत आहेत.
(२) सद्य:स्थितीत जिल्हा व तालुका स्तरावरील अधीक्षकांची पदे रिक्त आहेत. अन्य पदे ग्रामविकास विभागाअंतर्गत आहेत.
(३) विभागातील अधीक्षकांची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परतुर (जि.जालना) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८- सी या शेगाव ते पंढरपूर येथील नदीवरील सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) १०२७३ (२३-०८-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतुर (जि.जालना) तालुक्यात ९५ किलोमीटर लांबी असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८-सी या शेगाव ते पंढरपूर सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर पूर्णा, गोदावरी व कसुरा या तिन्ही नदीवरील पुलाचे काम मुदत संपल्यानंतर देखील प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीष्टी (ता.परतूर) येथील पुलाचे काम पूर्ण झाले असून केवळ पोच मार्ग न जोडल्याने सदर पुल वाहतूकीस सुरु करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,गोदावरी नदीवरील पूल व २ किमी लांबीचा रस्ता प्रलंबित असून पुर्णा नदीवळील पुलालगत ५० मी.चे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी सदरहु कामाला आठ दिवसात सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन देऊन अद्यापर्यंत कामास सुरुवात करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्णा, गोदावरी व कसुरा नदीवरील पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्यासह पुलांचे काम करणाऱ्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम स्टेट एजंसी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.सद्य:स्थितीत कंत्राटदाराने पूर्णा,गोदावरी व कसुरा या तिन्ही नदीवरील पुलांपैकी पुर्णा नदीवरील पुलाचे काम पुर्ण केले असून उर्वरित दोन्ही पुलांचे काम ९० टक्के पुर्ण झालेले आहे व सदर काम प्रगतीपथावर असून माहे डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

गोदावरी नदीवरील पुलाच्या जोडरस्त्याची एकूण लांबी ९४५ मी.(दोन्ही बाजूची)असून सद्यस्थितीत पुलाचे काम प्रगतीपथावर आहे.तसेच पुर्णा नदीजवळील पुलालगत ५० मी.रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे.

(४) कंत्राटदारामार्फत काम प्रगतीपथावर असून डिसेंबर, २०२५ अखेर कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) सन-२०१७ ते ऑक्टो-२०२१ पर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन धोरणात वेळोवेळी झालेला बदल, कोवीड-१९ महामारीमुळे झालेला उशीर, मुरुम उत्खननावर दिर्घ कालावधीसाठी असलेली बंदी, स्थानिक लोकांनी काम करण्यास केलेला विरोध, गोदावरी नदीपात्रामध्ये काही शेतकऱ्यांमार्फत विनापरवाना वारंवार पाणी सोडणे इ. कारणांमुळे कामास विलंब झालेला आहे. केंद्रिय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय,यांचा कंत्राटदारासमवेत उर्वरीत कामासाठी पुरवणी करार करण्यात आला असून करारामध्ये देखभाल व दुरुस्ती कालावधीत उर्वरीत कामे पुर्ण करण्याचे अंतर्भुत केले असून ती कामे प्रगतीपथावर आहेत.

---

## सोशल मीडियाचा महिलांची बदनामी आणि छळ करण्यासाठी मोठया प्रमाणात वापर होत असल्याबाबत

**(४३) १०२९८ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोशल मीडियावर महिलांची बदनामी आणि छळ करण्याच्या प्रकारामध्ये वाढ झालेली असून त्यानुसार किती तक्रारी अधिकृतपणे दाखल झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांना लक्ष्य करून त्यांची बदनामी आणि छळ करण्यासाठी छायाचित्रे आणि व्हिडिओंचा गैरवापर करण्याचे प्रमाण वाढण्यामागील सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक कारणे काय आहेत, तसेच गुन्हेगार सायबर गुन्ह्यांसाठी कोणत्या नवीन पद्धती आणि साधनांचा अवलंब करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोशल मीडियावर महिलांची बदनामी आणि छळ करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये आणखी कोणत्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून गुन्हेगारांना प्रभावीपणे शिक्षा देता येईल आणि महिलांना संरक्षण मिळू शकेल, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सोशल मीडियावर बदनामी आणि छळाला बळी पडलेल्या महिलांसाठी त्वरित आणि सुरक्षितपणे तक्रार दाखल करणे, त्वरित न्याय मिळण्यासाठी कोणती विशेष व्यवस्था, मानसिक आधार, पोलीस, सायबर गुन्हे विभाग आणि आवश्यक कायदेशीर मदत पुरवण्यासाठी यंत्रणा कार्यरत असून ती प्रभावीपणे कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त गंभीर प्रकरणाची शासनाने दखल घेवून भविष्यात सोशल मीडियावर महिलांची बदनामी आणि छळ रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०२५) :** (१) सन २०२३ ते जुलै, २०२५ पर्यंतची महिला संदर्भात दाखल सायबर गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| २०२३ | १६५७ | ५३६ | ५१४ |
| २०२४ | १८४५ | ६३९ | ४४६ |
| जुलै २०२५ | ८७८ | ३४९ | २२६ |

(२) स्मार्टफोन व उच्च गुणवत्तेचे कॅमेरे, क्लाउड-बॅकअप आणि स्वयंचलित सिंक, डेटा-स्क्रॅपिंग व OSINT साधने, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) व GANs, Face-swap व Voice cloning, डिप फेक, थ्रेट आधारित शोषण (Sextortion), SIM Swap, account takeover, OTP interception, RATs/ malware, kompromat building, Automated botnets for redistribution इत्यादि साधनांचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर करून सार्वजनिक प्रोफाइल्समधून सहज माहिती गोळा करणे, खाजगी फाईल्स लिक करणे, फोटो/ व्हिडिओ, चेहरा व आवाज मध्ये बदल करण्यात येतो. सायबर गुन्हेगारींची डिजिटल साधने कमी खर्चात उपलब्ध असल्याने गुन्हेगारांना जास्त फायदा होतो. एन्क्रिप्शन व ॲनॉनिमिटीमुळे गुन्हेगांराना शोधणे कठीण जाते.

(३) महिलांविरूध्द वाढत्या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी भारतीय न्याय संहिता, २०२३ व माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये कार्यवाही करण्यात येते. परंतू सायबर गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी AI-Deep fake व

छायाचित्र/व्हिडिओ गैरवापरावर कठोर शिक्षेची तरतूद, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना तात्काळ कंटेंट हटविण्याची जबाबदारी व डिजिटल पुरावे जतन बंधनकारक करणे, यासुधारणा आवश्यक आहेत.

(४) National Cyber Crime Reporting Portal (www.cybercrime.gov.in) व हेल्पलाइन १९३० यांद्वारे त्वरित व सुरक्षितपणे तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग यांच्याकडून कायदेशीर मार्गदर्शन, तक्रार नोंदणी व आवश्यकतेनुसार पोलीस यंत्रणेशी समन्वय केला जातो.

तसेच संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाकडून " One Stop Centre " ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्हयात एक "One Stop Centre " सुरू करण्यात आले आहे. या One Stop Centre मध्ये कौटुंबिक हिंसाचार पीडित, लैंगिक शोषणाच्या पीडित, मानवी वाहतुकीस बळी पडलेल्या, ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलेस वैद्यकीय सुविधा, पोलीस मदतकेंद्र, समुपदेशन केंद्र व कायदेशीर मदत इत्यादी सेवा उपलब्ध करून देण्यात येतात.

(५) सन २०१९ पासून महाराष्ट्र राज्य सायबर कार्यालयाने यांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पोलीसांच्या सहभागाने "सायबर सेफ वुमन" ही मोहिम सुरू केली आहे. त्या मध्ये इंटरनेट वरील फिशींग, वैवाहिक विषयक साईट वरील ओळख चोरी, फोटो मधील फेरबदल, बँका संदर्भातील फसवणूक, पोर्नोग्राफी, सायबर बुलिंग यांची माहिती देणारी संकेतस्थळे याबाबत प्रतिबंधात्मक उपाय, सायबर गुन्ह्यांसंदर्भातील कायदे तसेच सोशल मिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळा राबवण्यात येतात.

महाराष्ट्र सायबर कार्यालयात CYBER CRIME PREVENTION AGAINST WOMEN AND CHILDREN (CCPWC) पोर्टल कार्यरत असून त्यावर राज्यभरातील महिला ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात. सदर तक्रार दाखल केल्यानंतर सदर तक्रारीची तांत्रिक तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयात (CCPWC) लॅबची स्थापना करण्यात आली असून त्यानुसार महाराष्ट्र सायबर कडून तात्काळ संबधित जिल्ह्यांना तक्रार पाठविण्यात येते व त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येते.

महिला व बालक यांच्या संदर्भातील सायबर सुरक्षिततेबाबतच्या इंटरनेट वापरताना घ्यावयाच्या काळजीबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ०५ जानेवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित केल्या आहेत.

---

## चाकण (जि.पुणे) टप्पा क्रमांक ५ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत

**(४४) १०३१७ (२९-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) टप्पा क्रमांक ५ प्रकल्प मधील बाधित शेतकरी यांची जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांच्या विविध समस्यांबाबत माहे मार्च, २०२५ मध्ये त्यांच्या दालनात घेतलेल्या बैठकीत प्रकल्प बाधित शेतक-यांना नियमानुसार भूखंड देण्यासाठी दिनांक १ एप्रिल ते १० एप्रिल, २०२५ दरम्यान त्याचे अर्ज घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती प्रकल्प बाधित शेतकरी यांना भूखंड देण्यात आले, एकूण किती खातेदार यामध्ये बाधित झाले, किती खातेदार हे प्रकल्प बाधित भूखंड घेण्यास पात्र झाले याचा तपशील देण्यात आला आहे काय,

(३) तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या

बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, (बैठक क्रमांक ३९७, विषय क्रमांक २५ नुसार घेतलेला ठराव क्रमांक ६६३८ प्रमाणे) चाकण औद्योगिक टप्पा ५ साठी निश्चित केलेल्या निकषांतर्गत घेतलेला निर्णय त्याच टप्प्यातील इतर अन्य बाधित व्यक्तींचा समावेश केला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच, जे बाधित शेतकरी अल्प भूधारक होते मात्र प्रकल्प बाधित भूखंड पात्र ठरले नाही त्यांना शासन १ गुंठा वाणिज्य भूखंड देऊन कायमस्वरूपी उदरनिर्वाहचा प्रश्न सोडविण्यात येणार आहे काय, तसेच, भूसंपादन कायदा सन २०१३ नुसार प्रकल्प बाधित शेतकरी यांचे सामाजिक व आर्थिक स्थिती सर्वेक्षण करून MIDC धोरणामध्ये बदल करून सर्व खातेदार शेतकरी यांचे पुनर्वसन करण्यासाठी धोरण बदलण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यासह बाधित खातेदार यांना सदर क्षेत्रात The Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, २०१४ नुसार व्यवसाय करण्यासाठी जागा आरक्षित करणार काय व हेच चाकण टप्पा क्रमांक १ ते ४ सह खेड सिटी सह खेड सेझ अंतर्गत धोरण लागू होणार आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने प्रकल्प बाधित यांना भूसंपादन कायदा,२०१३ नुसार पुर्नवसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

चाकण टप्पा क्र.५ मध्ये एकूण खातेदार संख्या २६६१ इतकी आहे.त्यापैकी १५६० खातेदारांनी नुकसान भरपाई स्विकारलेली असून, १५% परतावा देय असलेल्या खातेदारांची संख्या ११६७ इतकी आहे. त्यापैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे परतावा भूखंड मिळणेसाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ अखेर ४७३ इतके अर्ज प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त अर्जांपैकी १३० पात्र प्रकल्प बाधित खातेदारांना दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ अखेर भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महाराष्ट्र महामंडळाच्या (MIDC) संचालक मंडळाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, (बैठक क्रमांक ३९७, विषय क्रमांक २५ नुसार घेतलेला ठराव क्रमांक ६६३८ प्रमाणे) चाकण औद्योगिक टप्पा ५ साठी निश्चित केलेल्या निकषांतर्गत घेतलेला निर्णय १७ खातेदारांसाठी असून, इतर अन्य बधीत व्यक्तीचा त्यामध्ये समावेश नाही.

(४) व (५) सदर बाब धोरणात्मक आहे.

ज्या खातेदारांच्या किमान ०.१०.० हे. आर पेक्षा जास्त जमिनी औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात आलेल्या आहेत अशा प्रकल्पबाधितांना परतावा इ. स्वरुपात भूखंडाचे वाटप करण्याचे महामंडळाचे धोरण आहे. त्यामुळे अशा प्रकल्पबाधितांना भूखंडाचे वाटप करण्यासाठी जागा आरक्षित करण्यात येतात.

(६) मऔवि महामंडळाच्या धोरणाप्रमाणे प्रादेशिक कार्यालयामार्फत पात्र खातेदार यांना लवकरात लवकर परतावा भुखंडाचे देकार पत्र, वाटप पत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच यापुर्वी देकारपत्र पारित करण्यात आलेल्या खातेदारांना मऔवि महामंडळाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राचे वाटप पत्र पारित करण्यात आलेले असुन, तावा अप्राप्त असलेल्या क्षेत्राचा ताबा कलम ३३ (३) अन्वये प्राप्त झाल्यानंतर भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

---

**खेड तालुक्यातील लाभ क्षेत्रातील गावांना**
**आरक्षित केलेले पाणी रद्द केल्याबाबत**

**(४५) १०३४२ (२३-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील भामा आसखेड धरण लाभ क्षेत्रातील गावांचे पाणी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकांना आरक्षित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील लाभ क्षेत्रातील गावांना जे पाणी आरक्षित करण्यात आले ते रद्द करताना लाभ क्षेत्रातील बाधित गावांची संमती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भामा आसखेड धरण प्रकल्पामुळे हेतू सह कालवे रद्द करण्यात आले ज्या हेतूने लाभ क्षेत्रातील गावांची पुनर्वसन कायद्याने जमीन घेऊन प्रकल्प बाधित शेतकरी यांना देण्यात आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्या महापालिका व अन्य संस्थांना बिगर सिंचन आरक्षण देण्यात आले आहे यामुळे लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सामाजिक, आर्थिक नुकसानीबाबत भूसंपादन कायदा, २०१३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करणार आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, जो अहवाल समोर येईल त्यानुसार उपाययोजना सह चासकमान, कळमोडी प्रकल्प अंतर्गत चासकमान उजवा कालवा अस्तरीकरण नव्याने पोट कालवे करून भामा आसखेड पाणी आरक्षण समायोजन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०१-२०२६) :** (१) होय. भामा आसखेड धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ७.६७ टीमसी आहे. त्यापैकी भामा आसखेड धरणातून पुणे महानगरपालिकेस २.६७ टीमसी तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस २.१४ टीमसी पाणी आरक्षण मंजूर आहे.

(२) होय. भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात होणारे नागरीकरण व औद्योगीकरण यामुळे लाभक्षेत्रातील विविध संघटना, ग्रामपंचायत व लोकप्रतिनिधी यांनी लाभक्षेत्र वगळण्याबाबत मागण्या केलेल्या आहेत.

(३) होय. भामा आसखेड प्रकल्प बाधीतांच्या पुनर्वसनासाठी संपादित करण्यात आलेल्या लाभक्षेत्रातील जमीनीपैकी अंशत: जमीनी प्रकल्पबाधितांना वाटप करण्यात आलेल्या आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

भामा आसखेड प्रकल्पाद्वारे खेड, हवेली, दौंड तालुक्यातील ४२ गावांना २३११० हेक्टर एवढ्या सिंचन क्षेत्रास लाभ मिळणार होता. तथापि, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांना प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्यासाठी पाणी आरक्षणाची मंजुरी दिल्यामुळे धरणाची कालवे प्रणाली शासन निर्णय, क्र.भामाआ-०४१६/(प्र.क्र. २९१/१६)/मोप्र-१, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे.

(५) व (६) स्थानिक लोकप्रतिनिधी व लाभधारकांच्या मागणीनुसार शासन निर्णय क्र. भामाआ-०४१६/ (प्र.क्र.२९१/१६) मोप्र-१ दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाचे दोनही कालवे रद्द करण्यात आलेले आहेत. शासनाचे पिण्याच्या पाण्यासाठी प्राधान्य देण्याचे धोरण असल्याने याप्रकरणी कोणतेही सर्वेक्षणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**औसा विधानसभा मतदारसंघातील भूकंप पुनर्वसित गावातील कबाले वाटपाबाबत**

**(४६) १०३४४ (२०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा विधानसभा मतदारसंघातील भूकंप पुनर्वसित किल्लारी व इतर गावातील नागरिकांना शासनाने घरे वाटप केली परंतु अनेक लाभार्थींना सदरील घरांची कबाले (मालमत्तेचा हिस्सा) वाटप करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हाधिकारी लातूर यांनी दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान औसा तहसील कार्यालात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत प्रलंबित लाभार्थ्यांना कबाले वाटप करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूकंप पुनर्वसनाअंतर्गत किती लाभार्थ्यांना आजतागायत कबाले वाटप केली आहेत व किती लाभार्थींना अद्याप कबाले वाटप झाली नाहीत,

(३) असल्यास, उक्त भूकंप पुनर्वसित गावातील सर्व लाभार्थ्यांना कबाले वाटप करण्याबाबत किती कालावधी लागेल,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रलंबित लाभार्थ्यांना कबाले वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०८-१२-२०२५) :** (१) होय.

(२) औसा विधानसभा मतदार संघातील औसा तालुक्यातील एकूण लाभार्थी संख्या १६२८३ असून त्यापैकी तहसील कार्यालयामार्फत १३७१९ लाभार्थी यांना कबाला वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना मालकी हक्क प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही चालू आहे.

(३), (४) व (५) प्रस्तूत औसा व निलंगा तालुक्यातील उर्वरीत भूकंपग्रस्त पुनर्वसित लाभार्थ्यांना मालकी हक्क प्रमाणपत्र देण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी व प्रक्रीया जलद करण्यासंदर्भात जिल्हा पुनर्वसन अधिकारी, लातूर व जिल्हाधिकारी, लातूर यांच्या समवेत बैठक घेऊन उचित निर्देश देण्यात येतील.

---

**आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) येथील गट नंबर ८१२ मधील जमिनीबाबत**

**(४७) १०३४६ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) येथील गट नंबर ८१२ मधील जमीन शासनाच्या मालकीच्या जमिनीचे वाटप भूमीहीन शेत मजूर, अनुसूचित जाती व जमातीसह पवना धरण बाधित शेतकऱ्यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक ५ मधील जमीन संपादित करण्यात आली असून सदर संपादनात शासनाकडून जमीन भूमीहीन शेत मजूर, अनुसूचित जाती व जमाती सह पवना धरण बाधित शेतकऱ्यांना केली असून बहुतांश बाधित शेतकरी यांच्या जमिनी काही लोकांनी घेतल्या असून भूमिहीन शेतकरी पुन्हा रस्त्यावर आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक ५ मधील जमीन संपादनाच्या अनुषंगाने अनुसूचित जमाती शेतकरी यांच्या संबंधीत विविध न्यायालयीन दावे व याचिका दाखल झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने चौकशी समिती नेमून सर्व प्रकरणी निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे येथील जमीन गट नं. ८१२/१/1 ते ८१२/१/९८ एवढे भुखंड शेतीप्रयोजनासाठी तत्का. तहसिलदार खेड यांनी फेरफार क्र. ४१७ अन्वये भुमीहीन व मागासवर्गीय लोकांना कसण्यासाठी नवीन अविभाज्य शर्तीने भोगवटादार वर्ग २ शर्तीने वाटप केलेले आहे. प्रस्तृत गटात वाटप केलेले काही जमीनधारक हे आदिवासी जमाती पैकी असल्याने फेरफार क्र. १२११ अन्वये त्यांचे ७/१२ सदरी इतर हक्कात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६ अ च्या बंधनास पात्र असा शेरा नमूद आहे. तसेच ८१२/२/१ ते ८१२/२/२७ हे भूखंड पवना धरणग्रस्त जमीनधारकांना फेरफार क्र. ६८२ अन्वये वाटप केलेले आहे.

(२), (३) व (४) गट क्र. ८१२ मधील जमीन संपादन करण्यात आलेली आहे. उक्त वाटप केलेल्या भुखंडधारकापैकी काही जमीनधारकांनी बिगरआदिवासी व्यक्तींबरोबर करार करुन जमीनीचा मोबदला स्विकारला होता. मात्र संबंधितांना आवश्यक त्या पुर्व परवानगी घेऊन खरेदीखत करता न आल्यामुळे त्यांनी मे. दिवाणी न्यायालयात दावे दाखल केलेले होते. सदरच्या दाव्यांमध्ये तडजोडनामे झाले व काही दावे न्यायप्रविष्ट आहेत. सबंधित बिगर आदिवासी इसमांनी मे, कोर्टातील तडजोडनामे / डिक्री/ प्रलंबित दावे प्रती सादर करून नुकसान भरपाई रक्कम जमीनधारकास न देता त्यांना देण्याची मागणी केली होती. अशा प्रकारच्या दाव्यामंध्ये या कार्यालयाने आदिवासीधारकांच्या हक्क व अधिकारांचे रक्षण करण्यासाठी नुकसान भरपाई रक्कम आदिवासी जमीनधारकांचे नावे देण्याचे आदेश पारीत केलेले आहेत. उक्त दाव्यांमध्ये मा. उच्च न्यायालयामध्ये वेगवेगळया रिट याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या. पैको २५ रिट याचिका एकत्रात चालवून में. उच्च न्यायालयाने Writ Petition (ST) No.१३३८/२०२० other २४ मध्ये दिनांक २९/०७/२०२० रोजी निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयानुसार संपादीत जमीनीची नुकसान भरपाई रक्कम मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे कोर्टात वाट्पाकामी जमा करण्याचे आदेश दिलेले होते. सदर आदेशानुसार आदिवासी भूधारकांच्या नुकसान भरपाईची रक्कम १५ टक्के परतावा भूखंडाची रक्कम कपात करुन मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात जमा करणेत आलेली आहेत. तसेच इतर दाखल दाव्यातील प्रकरणे देखील महाराष्ट्र ओद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३५ अन्वये मे. जिल्हा न्यायालयात वर्ग करणेत आलेली आहेत.

तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त नमूद आदेशाविरुध्द श्री. गौतम किसन वडवे यांनी मा. उच्च न्यायालयाचे आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे Special Leave Petition (Civil) No. १०६६१/२०२० दाखल केलेले असून त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिनांक ०७ सप्टेंबर, २०२० रोजीच्या आदेशाने मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या आदेशाच्या अमंलबजावणीला स्थगिती दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## किल्लारी ता.औसा,जि.लातूर येथै येथे हेलीपॅड करण्याबाबत

**(४८) १०३५८ (२९-०६-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किल्लारी (ता.औसा, जि.लातूर) येथे शासकीय जमिनीवर हेलीकॉप्टर उतरण्यासाठी प्रत्येक तालुक्यात हेलीपॅड बांधण्याबाबत शासनाची योजना आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हेलीपॅडसाठी उपलब्ध जागेची पाहणी करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, लातूर यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार हेलीपॅड बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३१-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
(३) शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०१८ मधील निकषानुसार किल्लारी ता. औसा येथे जागेची प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार सदर जागा अपूरी आहे. निकषानुसार जागा प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन सहकारी साखर कारखान्यांना स्थापनेबाबत २००२ पासून असलेल्या निर्बंधांबाबत**

**(४९) १०३६६ (३०-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकारी साखर कारखान्यांना सन २००२ पासून निर्बंधांचा सामना करावा लागत असताना खाजगी साखर कारखान्यांवर कोणतेही बंधन नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००२ पासून राज्यात किती खाजगी साखर कारखाने स्थापन झाले आहेत, याव्यतिरिक्त, या कालावधीत किती सहकारी साखर कारखाने खाजगी कंपन्यांनी अधिग्रहित केले आहेत,
(३) असल्यास, सदर सहकारी साखर कारखाने आणि दुग्ध धोरणांना चालना देण्यासाठी एक अभ्यास समिती स्थापन करून खाजगी साखर कारखान्यांना परवानगी न देणाऱ्या साखर कारखान्यांबाबत गुजरात राज्याच्या धर्तीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे तसेच धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०८-०१-२०२६) :** (१) सहकार विभागाच्या दिनांक २३ जानेवारी, २००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात नवीन सहकारी साखर कारखान्यांना बँकेत खाते उघडण्यास व नोंदणीस परवानगी देण्यात येत नाही.

खाजगी साखर कारखाने शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ मधील तरतूदीप्रमाणे स्थापन केले जातात, त्यामुळे खाजगी साखर कारखाने स्थापन करण्यासाठी निर्बंध नाहीत हे खरे नाही.
(२) सन २००२ पासून आतापर्यंत १०१ खाजगी साखर कारखाने सुरु झालेले आहेत. सन २००२ पासून अधिग्रहित करण्यात आलेले सहकारी साखर कारखाने :-

महाराष्ट्र शासन-३, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक -२८, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक-०४, इतर वित्तीय संस्था-२ असे एकूण ३७ सहकारी साखर कारखाने अधिग्रहित करण्यात आले आहेत.
(३) व (४) राष्ट्रीय सहकार विकास निगम यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळत्या भागभांडवलासाठी सहकारी साखर कारखान्यांना मार्जिन मनी कर्ज मंजूर करण्यासाठी सहकार विभागाच्या दिनांक ०१ मार्च, २०२४ व दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

तसेच सहकारी-खाजगी दूध संघ व दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे व दुग्धव्यवसाय वाढीसाठी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट साध्य होण्याकरीता कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संग्राम दुर्ग किल्ल्याचे (ता. चाकण, जि.पुणे) एकात्मिक संवर्धन, जतन व विकास करण्याबाबत**

**(५०) १०३७१ (०७-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्राम दुर्ग किल्ल्याचे (ता. चाकण, जि.पुणे) एकात्मिक संवर्धन, जतन व विकास करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी पुरातत्व विभाग यांना लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ल्यांचे संवर्धन व सुरक्षिततेकरिता किल्ला नगरपरिषदेच्या ताब्यात देण्याची मागणी चाकण नगरपरिषदेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर किल्ला व पूर्वेकडे "क" वर्ग दर्जा प्राप्त असलेले चक्रेश्वर मंदिर विकास आराखड्याकरिता निधीची तरतूद जिल्हा नियोजनसह, चाकण नगरपरिषद यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

श्री. बाबाजी काळे, विधानसभा सदस्य (खेड-आळंदी) यांनी संग्रामदुर्ग किल्ला (ता. चाकण, जि. पुणे) या किल्ल्याचा विकास आराखडा तयार करणे बाबतचे विनंती पत्र मा. उपमुख्यमंत्री महोदय याचे कार्यालयास सादर केले होते. सदर पत्रावर उचित कार्यवाही करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून सहाय्यक संचालक, पुणे यांना दिनांक २२ जुलै, २०२५ कळविण्यात आले होते.

सदयस्थितीत संग्रामदुर्ग किल्लयावर जिल्हा नियोजन विकास निधी व राज्य पुरातत्व विभागाच्या निधीमधून जतन व संवर्धनाची कामे मंजूर आहेत. संग्रामदुर्ग किल्ल्याचे जतन व सवंर्धन करण्याच्या अनुषंगाने ढोबळ अंदाजपत्रक पुरातत्व विभाग, पुणे यांनी तयार केले असून वेळोवेळी प्राप्त निधीमधून टप्याटप्याने या किल्ल्याच्या सर्वांगीण विकासाबाबत कामे करणे शक्य आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.